<u>वाहतूक नियंत्रण अधिसुचना</u>

जा.क्र.पोउआ/वाहतुक/नियोजन/477 /२०२२ पिंपरी चिंचवड शहर दिनांक- 16/०२/२०२२

निगडी वाहतूक विभाग हद्दीतील पवळे उड्डानपुलाचे रंगसफेदी व स्थापत्य विषयक कामे करण्याचे काम चालु आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन आनंद भोईटे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

<u>निगडी वाहतूक विभाग</u>

१. पुण्याकडुन येणारी पवळे ब्रिज वरुन जाणारी वाहने पवळे ब्रिजवर न जाता डाव्या बाजुच्या ग्रेडसेपरेटरच्या आऊट लेन मधुन बाहेर काढुन प्रेस्टीज कॉम्पलेक्स समोरुन टिळक चौकामार्गे सर्व्हिस रोडने निगडी प्राधिकरण चौकी समोरुन पुढे सरळ पुलावर जातील.

२. मुंबई कडुन येणारी वाहने पवळे ब्रिज निगडी गावठाण हनुमान मंदीरा शेजारी पंक्चर मधुन टिळक चौकाकडे बाहेर पडतील.

दि. 16/२/२०२२ ते २/३/२०२२ पर्यंत वरील प्रमाणे वाहतूकीत बदल करण्यात येत आहे.

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. वरील प्रमाणे वरील वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,

नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक निगडी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) मे मे. राहुल कंस्ट्रक्शन कंपनी

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.